# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

जा.क्र.मऔविम/भूविभाग/कार्या-१/ D00872 दिनांक : 11-09-2019

## परिपत्रक

विषय : हस्तांतर मार्गदर्शक तत्वात सुधारणा करणेबाबत..

संदर्भ : १. No.MIDC/DCM/Transfer Guidelines/६५१/२६३३, दि. १२.०८.१९९८

२. क्र.मऔविम/मुदतवाढ/विधी व कामकाज/१४३, दि. १२.१२.२०११

३. क्र.मऔविम/विधी व कामकाज/१६४, दि. ०१.०१.२०१३

महामंडळाच्या दि. १२.०५.१९९८ च्या परिपत्रकान्वये भूखंड हस्तांतराबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानंतर दि. १२.१२.२०११ आणि दि. ०१.०१.२०१३ च्या परिपत्रकान्वये उक्त मार्गदर्शक तत्वात सुधारणा करण्यात आली आहे. तथापि, उक्त धोरणाप्रमाणे, scheme of amalgamation, takeover, merger or demerger etc. प्रकरणामध्ये उद्योजक कंपनीच्या संचालक /भागधारक यांचे भागभांडवलामध्ये कोणताही बदल होत नसल्याने तसेच कंपनी व्यवस्थापनामध्ये देखील कोणताही बदल होत नसल्याने फरकाची रक्कम आकारणी करण्या ऐवजी प्रमाणित हस्तांतर शुल्क आकारण्याची मागणी होत असल्याने त्या अनुषंगाने सादर प्रस्तावावर मा. संचालक मंडळाच्या दि. २०.०६.२०१९ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ५९२७ अन्वये दि. १२.१२.२०११ च्या परिपत्रकामध्ये सुधारणा करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

उक्त ठरावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे दि. १२.१२.२०११ च्या परिपत्रकामध्ये सुधारणा करण्यात येत आहे-

Scheme of amalgamation, takeover, merger or demerger etc. अशा प्रकरणांमध्ये मूळ भूखंडधारक कंपनीच्या संचालक /भागधारक यांचे भागभांडवलामध्ये कोणताही बदल होत नसल्यास तसेच कंपनी व्यवस्थापनामध्ये देखील कोणताही बदल होत नसल्यास सदरच्या हस्तांतरणास बांधकामावर फरकाची रक्कम आकारणी न करता गुतवणुकीच्या निकषावर फरकाची रक्कम आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. जेथे गुंतवणूक रु. १००० कोटी अथवा मेगा प्रोजेक्ट अंतर्गत असल्यास अशा प्रकरणांसाठी सरसकट प्रचलित दराच्या २ टक्के फरकाची रक्कम आकारण्यात यावी तसेच जेथे रु. १००० कोटी पेक्षा गुंतवणूक कमी आहे अशा प्रकरणात ५ टक्के फरकाची रक्कम आकारण्यात यावी.

उपरोक्त धोरण सद्य:स्थितील प्रलंबित प्रकरणांकरीता देखील लागू करण्यात यावे. परंतु ज्या प्रकरणी उपरोक्त ठरावाच्या दिनांका अगोदर हस्तांतरापोटी भूखंड/शेड/गाळा धारकांनी रक्कम भरणा केली आहे, त्यांचा पुनर्विचार करण्यात येऊ नये.

उक्त धोरणाची सर्व संबंधितांना नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मंजूरीने निर्गमित करण्यात येत आहे.

(अविनाश सुभेदार)
सह मुख्य कार्यकारी अधिकारी
मऔविम, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम./सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
५. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
६. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
७. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
८. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२)/जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१०. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
११. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई